VOL- VIII | ISSUE- IX | SEPTEMBER | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : महिला सक्षमीकरण एक दृष्टिक्षेप

**संशोधक**
**हर्षा विजय अंभोरे**
Email ID : harsha7083@gmail.com

**प्रस्तावना**

**स्त्री** ही मानव आहे हा विचार आधुनिक आहे. महाराष्ट्रातील समाजचिंतकांनी स्त्रीविषयक विचारातून तिची प्रतिष्ठा, समाजातील समान स्थान आणि तिचे स्वातंत्र्य अबाधित राहणे निकडीचे मानले. पुरूष सत्तेच्या अहंतेमुळे ती असुशिक्षित राहिली. कुटुंबसंस्थेत तिचे स्थान नगण्य होते. महात्मा फुले दांपत्य व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तिच्या हक्काचा विचार आग्रहपुर्वक मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर स्त्री वर्गाचे उध्दारकर्ते होते. स्त्री शिक्षण आणि तिचे मानवीय स्थान यांचा त्यांनी हिरिरीने पुरस्कार केला.

भारतामध्ये जेवढी स्त्रियांची अवनती झाली, तेवढी कोणत्याही देशात झाली नाही. स्त्रियांना या देशात अत्यंत हिन व पुरुषांपेक्षा दुय्यम स्थान देण्यात आले. स्त्रियांना परंपरागत गुलामगिरीतून काढून तिला स्वातंत्र्य देण्याचे व तिचा उद्धार करण्याचे कार्य भगवान बुद्ध, फुले दाम्पत्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महामानवांनी केले आहे. त्यांनी जे स्त्री मुक्तीसाठी कार्य केले, त्याला भारतीय इतिहासात तोड नाही. काळ जसजसा पुढे जाईल, येणारी पिढी प्राचिन भारतातील गुलाम स्त्री व आधुनिक भारतातील स्वतंत्र स्त्री यांचा तुलनात्मक अभ्यास करेल. तेव्हा संपूर्ण देश फुले-आंबेडकरांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्यापुढे झुकल्याशिवाय राहणार नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) महिला सबलीकरणाचा अर्थ व संकल्पना समजून घेणे.

२) महिला सक्षमीकरणाची गरज आवश्यकता समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

जी माहिती पूर्वी संकलित केलेली आहे. पुस्तकरूपाने किंवा वेगळ्या साधनांद्वारे तिथे संकलन केले गेले आहे. त्यातूनच संशोधनासाठी आवश्यक ती माहिती संकलित करणे, त्यांचे व्दितीय साधन सामग्री होय. उदा. ग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, नियतकालिके, संकेत स्थळ, सरकारी दस्तावेज, प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध इत्यादी प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन करीत असताना या पद्धतीचा वापर करून हे संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा**

१) इफ्लो इ.स. (२०११) :

महिला सशक्तीकरण आणि आर्थिक विकास नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनोमिक रिसर्च केंब्रिज या अभ्यासात त्यांनी असा निष्कर्ष काढला की, सशक्तीकरण आणि विकास यांचा संबंध कदाचित खूप जवळचा आहे. पुरुषी मानसिकतेने स्त्रियांना कायम कमकुवत आणि स्वतःच्या फायद्यासाठी धोरणे आखली आहे. म्हणून स्त्रियांना प्रत्येक क्षेत्रात समान संधी देण्यात यावी, यासाठी पुरुष आणि स्त्रिया यांच्या समता स्थापित करणे गरजेचे आहे

२) एच. सुब्रमण्यम 2011

यांनी भारतातील मागिल कालखंडातील महिलांच्या शिक्षणाची तुलना केलेली आहे. त्यांनी असे सांगितले की शाळेत जाणाऱ्या मुलींची हजेरी नोंदणीमध्ये प्रगती झालेली असून, त्यांना सामर्थ्य देणे गरजेचे आहे, म्हणून कायदेशीर अधिकार त्यांना दिले पाहिजेत.

३) सेतूरामन के. (२००८)

यांनी The role of woman's Empowerment and Domestic violence in Child Growth and under Nutrition in a tribal rural Community in South India. या नावे संशोधन पेपर लिहिला. त्यांनी असे मत मांडले की, महिलांचे सबलीकरण यामध्ये कौटुंबिक याचे प्रमाण अधिक आहे. त्यांना पौष्टिक आहार व पौष्टिक स्थितीचे प्रमाण कमी असल्यामुळे ग्रामीण आदिवासी समाजात ६ ते २४ महिन्यांचा मुलांमध्ये वाढीचे प्रमाण कमी दिसून येते. त्यांनी कर्नाटक राज्यातील ग्रामीण भागाचे निरीक्षण करून असे सुचविले की, भारत देशातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचा यामध्ये समावेश होतो.

**डॉ. आंबेडकरांची शैक्षणिक चळवळ :**

शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या मानसिक व बौध्दिक विकास घडवून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शास्त्र आहे. अशी धारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. त्यामुळे हजारों वर्षे ज्ञान मिळविण्याचा, शिक्षणाचा अधिकार नाकारलेल्या अस्पृश्य आणि मागासवर्गीयांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच त्यांना शैक्षणिक सुविधा प्राप्त व्हाव्यात, म्हणून स्वत:च बाबासाहेबांनी कृतिशील पुढाकार घेतला. त्यांना वस्तुस्थितीचे भान प्राप्त झाले असल्यामुळे त्यात कोणते परिपर्तन अपेक्षित आहे, हे त्यांना माहीत होते. बुध्दिमत्तेची प्रचंड शक्ती त्यांच्याकडे होती. याचा वापर त्यांनी उपेक्षितांच्या सुविधा निर्माण करून देण्यासाठी केला. हिंदू समाजव्यवस्थेतमध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन करण्यासाठी केला. शैक्षणिक चळवळ ही केवळ तात्त्विक बाबींवर उभी न करता त्याला प्रत्यक्ष मूर्तरुप देवून ही चळवळ बाबासाहेबांनी भक्कमपणे उभी केली. बाबासाहेबांना एकूणच भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जो बदल घडवून आणावयाचा होता, तो बदल शिक्षणाच्या माध्यमातूनच प्रभावी पध्दतीने आणि गतीने होऊ शकेल, यावर बाबासाहेबांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी आपल्या भाषणांमधून आणि लेखनामधून शैक्षिणिक विचार आणि शिक्षणाचे तत्वज्ञान, महत्त्व मांडत असतानाच त्या विचारांना कृतिशील करण्यासाठी प्रयत्न केले.

**महिला सक्षमीकरणाची आवश्यकता :**

महिला आत्मनिर्भर होण्यासाठी महिला सक्षमीकरण अतिशय आवश्यक आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या की, त्या स्वत:बरोबर कौटुंबिक आणि सामाजिक बदल घडवून आणू शकतात. महिला सशक्तीकरणात शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षणाने महिला दुसऱ्यांबद्दल विचार करायला शिकतात. महिला आर्थिक दृष्टीने स्वावलंबी झाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढतो. सर्व मानवजातीच्या विकासासाठी मुलींच्या शिक्षणाचे इतके परिणामकारक दुसरे साधन नाही. एका मुलीला शिकवणे म्हणजे अख्या कुटुंबाला शिकण्यासारखे आहे. याची जाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर होती. तेव्हा कायद्याने दिलेले अधिकार तिला मिळविता आले पाहिजे. त्यासाठी तिचे मनोबल वाढले पाहिजे. तिची मानसिक गुलामगिरी संपली पाहिजे, म्हणून मुलींना शिक्षित करण्याची त्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था त्यांनी केली.

**निष्कर्ष व शिफारशी**

देशात महिला सक्षमीकरण करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग असणे गरजेचे आहे, असे प्रस्तुत शोधनिबंधात नमूद करण्यात आले आहे. इथल्या व्यवस्थेने स्त्रियांना गुलामीचे जीवन जगण्यास भाग पाडले आहे. त्यासाठी त्यांना संविधानाने दिलेले सर्वच हक्क, अधिकार त्यांना देण्यात यावे. यामध्ये शैक्षणिक लिंगभेद, राजकीय, आर्थिक व सामाजिक इत्यादी घटकांचा समावेश करण्यात यावा, असे मत संशोधनात मांडले आहे.

१. महिलांचे सबलीकरण करायचे असेल तर महिलांना समाजात मुक्तपणे संवाद साधता यावा, याकरिता स्वातंत्र्य दिले पाहिजे.
२. ज्या ठिकाणी महिला काम करतात, तिथे त्यांच्या हिताचे बदल करून संरक्षण देण्यात यावे.
३. स्वयंरोजगारासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात यावे.
४. महिलांच्या आवश्यक असणाऱ्या संसाधनांवर बंदी न आणता त्यांचे निर्णय त्यांनी स्वतः घेण्यास प्रवृत्त करावे.
५. शिक्षणापासून वंचित ठेवता कामा नये. व
६. उच्च शिक्षण व कौशल्य आधारित शिक्षण देण्यात यावे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१) पाटील लीला, 2017, उद्योजक दिवाळी अंक 2017, औरंगाबाद, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, प्रिंटवेल इंटरनॅशनल, प्रकाशन, पृष्ठ क्रमांक - 45.
२) वैरागडे उज्वला आणि मुळे विद्युलता, 2013, सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, औरंगाबाद.
३) पाटील लीला, 2017, महिलांचे कर्तृत्व समाजासमोर यायला हवे, उद्योजक मासिक औरंगाबाद, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, पृष्ठ क्रमांक 23, 24.
४) शिरसाठ शशीमोहन राजाराम, मार्च 2018, औरंगाबाद, उंबरठ्याबाहेरील संधींचे क्षितिज, उद्योजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, पृष्ठ क्रमांक 23, 25.